Epaper

दैनिक जन

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

गणपती दर्शनानिमित्त आ. मंगेश चव्हाण यांची मुकेश पाटील यांनी घेतली भेट

(पान २ वर)



। बुधवार , दि. २३ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १६४ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

पवना नदी फेसाळली

पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहराची जीवनवाहिनी मानली जाणारी पवना नदी पुन्हा एकदा गंभीर प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. नदीपात्रात थेट प्रक्रिया न केलेले घातक रासायनिक पाणी आणि मैलामिश्रित सांडपाणी सोडल्यामुळे नदी मोठ्या प्रमाणावर फेसाळली असून, चिंचवड येथील केजुबाई बंधाऱ्यावर नदीपात्रात सध्या पांढऱ्याशुभ्र फेसाचे साम्राज्य पसरले आहे.शहरातील नागरिकांचे आरोग्य याविषयी तीव्र चिंता व्यक्त होत आहे.चिंचवड परिसरातील केजुबाई बंधाऱ्यावर पवना नदीच्या पृष्ठभागावर मोठ्या प्रमाणात फेसाचे दाट थर साचले आहेत. नदीपात्रातून वाहणाऱ्या या फेसयुक्त पाण्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची अपुरी क्षमता किंवा थेट नाल्यांद्वारे प्रक्रिया न करता नदीत सोडले जाणारे सांडपाणी, तसेच औद्योगिक वसाहतींमधून रात्रीच्या वेळी नदीपात्रात सोडले जाणारे रासायनिक सांडपाणी यामुळे हा प्रकार वारंवार घडत असल्याचे समोर येत आहे.

फडणवीस लातूर-धाराशिव-सोलापुरात, शिंदे बुलढाणा-अकोला-अमरावतीच्या दौऱ्यावर

राज्यात दुष्काळाचे सावट; सरकार 'ॲक्शन मोड'वर

मराठवाडा-विदर्भासह राज्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश स्थिती!

जन सम्राट टाईम्स

पुणे : । राज्यातील अनेक भागांत पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये उभ्या पिकांना पाण्याअभावी फटका बसला असून, सोयाबीन, कापूस, मका आणि अन्य पिकांचे नुकसान होत असल्याचे प्रशासनाच्या प्राथमिक आढाव्यातून समोर आले आहे.

मराठवाड्यातील लातूर, धाराशिव, बीड आणि परभणी या जिल्ह्यांमध्ये परिस्थिती गंभीर असल्याचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी हालचाली वाढवल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांचा दौरा करून शेतातील पिकांची पाहणी करणार आहेत. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बुलढाणा, अकोला आणि अमरावती जिल्ह्यांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून नुकसान आणि स्थानिक समस्यांची माहिती घेण्यावर या दौऱ्यांचा भर आहे. शिंदे यांच्या अमरावती-अकोला दौऱ्याची माहिती २२ सप्टेंबरलाच जाहीर करण्यात आली होती. मुख्यमंत्री फडणवीस लातूर जिल्ह्यातील औसा व निलंगा तालुक्यांतील जाऊ, खरोसा आणि लामजना परिसरातील नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करणार आहेत. त्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील विविध भागांत शेतकऱ्यांशी संवाद साधण्याचा कार्यक्रम आहे. धाराशिवमधील करजखेडा आणि कळंब तालुक्यातील मलकापूर येथेही पाहणी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात शेतकऱ्यांच्या नुकसानाची प्रत्यक्ष माहिती घेतली जाणार असून, मदतीबाबत सरकारकडून पुढील निर्णय होण्याची शक्यता आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले तसेच धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईकही पाहणी दौऱ्यात सहभागी होणार आहेत. दरम्यान, राज्य सरकारने दुष्काळसदृश परिस्थितीत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्राकडून मदत मिळविण्यासाठी आवश्यक माहितीही संकलित केली जात आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली दुष्काळ निवारणासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली असून, समितीला परिस्थितीचा नियमित आढावा घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बुलढाणा, अकोला आणि अमरावती जिल्ह्यांत पीक पाहणी करणार आहेत. नुकसानग्रस्त भागात पंचनामे करण्यासोबतच गावागावांत जाऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याच्या सूचना त्यांनी मंत्र्यांना दिल्या आहेत. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अमरावती जिल्ह्यातील वरूड-मोर्शी तालुक्यांतील परिस्थितीचा आढावा घेतला आहे. पाणीटंचाई, शेतकऱ्यांच्या समस्या आणि पिकांच्या नुकसानीबाबत जिल्हा प्रशासनाकडून माहिती घेण्यात आली.



जालन्यात 'वॉर रूम'; रोजच्या स्थितीवर नजर

पावसाचा मोठा खंड पडल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने दुष्काळ निवारण कक्ष अर्थात 'वॉर रूम' स्थापन केला आहे. जिल्ह्यातील आठही तालुक्यांतील पिकांची स्थिती, चाऱ्याची उपलब्धता, पाणीसाठा, पाणीपुरवठा, संभाव्य स्थलांतर, ई-पिक पाहणी, पाणी स्रोत आणि टँकर फिलिंग पॉइंट्स यांचा दररोज आढावा घेण्यात येणार आहे. राज्यातील पावसाच्या तुटवड्याची तीव्रता लक्षात घेता, दुष्काळ जाहीर करण्याच्या प्रक्रियेलाही वेग येण्याची शक्यता आहे.

एसटीचा वळसा वाढला, प्रवासही महागला; नाशिककरांना रस्ते कामांचा दुहेरी फटका

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात सुरू असलेल्या विविध रस्ते कामांमुळे वाहतुकीवर परिणाम होत असतानाच आता त्याचा थेट आर्थिक फटकाही प्रवाशांना बसू लागला आहे. रस्ते कामांमुळे एसटी बसेसच्या मार्गात बदल करण्यात आल्याने प्रवासाचे अंतर वाढले असून, परिणामी काही मार्गांवरील तिकीट दरात १० ते १५ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे नाशिककरांना रस्ते कामांचा दुहेरी फटका सहन करावा लागत आहे. द्वारका चौक परिसरात रस्त्याचे काम सुरू असल्याने गेल्या काही महिन्यांपासून एसटी महामंडळाच्या बसेस मेळा व ठक्कर बसस्थानकांऐवजी पंचवटीतील निमाणी बसस्थानकातून सोडण्यात येत होत्या. दरम्यान, द्वारका चौकातील वाहतुकीसाठी रस्ता काही अंशी खुला झाल्यानंतर धुळे, नंदुरबार आणि जळगाव मार्गावरील बसेस ११ सप्टेंबरपासून पुन्हा नवीन मेळा आणि ठक्कर बसस्थानकातून सोडण्यास सुरुवात झाली आहे. मार्ग बदलल्याने अंतरात वाढ शहरातील वाहतूक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलामुळे धुळे आणि जळगावकडे जाणाऱ्या एसटी बसेसना आता पूर्वीच्या तुलनेत अतिरिक्त अंतर कापावे लागत आहे. वाहतूक विभागाने निश्चित केलेल्या नवीन वळण मार्गावरूनच बसेस चालविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परिणामी प्रत्येक फेरीचे अंतर वाढल्याने त्याचा परिणाम तिकीट दरावर झाला आहे. विभाग नियंत्रक भगवान जगनोर यांनी नवीन वाहतूक मार्गाचा अवलंब करण्याबाबत चालक-वाहकांना तसेच संबंधित जिल्ह्यांच्या विभाग नियंत्रकांना सूचना दिल्या आहेत.धुळे मार्गावर ४.१ किमीचा अतिरिक्त फेरा मेळा बसस्थानकावरून पूर्वी धुळ्याकडे जाणाऱ्या बसेस गडकरी चौक, सारडा सर्कल आणि द्वारका मार्गे जात होत्या. मात्र, आता या बसेस एन. डी. पटेल रोड, सारडा सर्कल, नॅशनल उर्दू स्कूल, मुंबई नाका आणि त्यानंतर द्वारका मार्गे धुळे असा प्रवास करीत आहेत. परतीच्या प्रवासासाठीही हाच मार्ग वापरला जात असल्याने प्रत्येक बसला दोन्ही दिशांनी अतिरिक्त अंतर कापावे लागत आहे. धुळे मार्गावर सुमारे ४.१ किलोमीटरचा अतिरिक्त वळसा पडत असल्याने प्रवासाचे अंतर वाढले आहे. त्यानुसार तिकीट दरात १० रुपये किंवा त्याहून अधिक वाढ करण्यात आली आहे. पुणे, अहिल्यानगर मार्गावरही परिणाम केवळ धुळे-जळगाव मार्गच नव्हे, तर पुणे आणि अहिल्यानगर मार्गावरील एसटी बसेसनाही सुमारे ३.१ किलोमीटरचे अतिरिक्त अंतर कापावे लागत आहे. प्रशासनाची गरज असली तरी, त्याचा थेट परिणाम प्रवाशांच्या खिशावर होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. वाढीव अंतरामुळे इंधन, वेळ आणि प्रवास खर्च वाढत असताना तिकीट दरातही झालेली वाढ ही प्रवाशांसाठी अतिरिक्त आर्थिक भार ठरत आहे. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात सुरू असलेल्या विविध रस्ते कामांमुळे वाहतुकीवर परिणाम होत असतानाच आता त्याचा थेट आर्थिक फटकाही प्रवाशांना बसू लागला आहे. रस्ते कामांमुळे एसटी बसेसच्या मार्गात बदल करण्यात आल्याने प्रवासाचे अंतर वाढले असून, परिणामी काही मार्गांवरील तिकीट दरात १० ते १५ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे नाशिककरांना रस्ते कामांचा दुहेरी फटका सहन करावा लागत आहे. द्वारका चौक परिसरात रस्त्याचे काम सुरू असल्याने गेल्या काही महिन्यांपासून एसटी महामंडळाच्या बसेस मेळा व ठक्कर बसस्थानकांऐवजी पंचवटीतील निमाणी बसस्थानकातून सोडण्यात येत होत्या. नंदुरबार आणि जळगाव मार्गावरील बसेस ११ सप्टेंबरपासून पुन्हा नवीन मेळा आणि ठक्कर बसस्थानकातून सोडण्यास सुरुवात झाली आहे.



पहिले पत्नी आणि घरी आलेल्या दोन पुजाऱ्यांना संपवलं

जन सम्राट टाईम्स

आजमगड । प्रतिनिधी: उत्तर प्रदेशातील आजमगडमध्ये पत्नी, मुलगा आणि दोन पुजाऱ्यांची हत्या करणाऱ्या आरोपीचा पोलिसांनी एन्काऊंटर केला आहे. आरोपीने या सर्वांची हत्या केल्यानंतर आपल्या घरात मुलांना ओलीस ठेवले होते. अखेर पोलिसांनी आरोपीचा एन्काऊंटर केला

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ओलीस ठेवलेल्या तीन मुलांना वाचवण्यासाठी ऑपरेशन सुरू असताना आरोपी अरविंद सिंहने पोलिसांवर गोळीबार केला. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या प्रत्युत्तरादाखल गोळीबारात अरविंद सिंह ठार झाला. दरम्यान, घटनेदरम्यान आरोपीने गोळी मारलेल्या त्याच्या 10 वर्षांच्या मुलाचाही गंभीर दुखापतीमुळे मृत्यू झाला. आरोपीच्या दोन मुलींना पोलिसांनी सुरक्षितपणे बाहेर काढले असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.उत्तर प्रदेशातील आजमगडमध्ये पत्नी, दोन पुजारी आणि स्वतःच्या मुलाची हत्या करणाऱ्या आरोपीचा अखेर रक्तरंजित अंत झाला आहे. सुमारे 8 तास चाललेल्या हाय-व्होल्टेज रेस्क्यू ऑपरेशननंतर पोलिसांनी आरोपी अरविंद सिंह याला एन्काऊंटरमध्ये ठार केले. 7 तासांच्या थरारक घटनेत आरोपीसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी सुमारे 7 तास सातत्याने



समजूत घालून आरोपीला मुलांना सोडण्यास सांगितले. मात्र, आरोपी मुलांना सोडण्यास तयार नव्हता. आरोपी सकाळपर्यंत वाट पाहण्याचे सांगत होता. पोलिसांच्या अनेक प्रयत्नांनंतरही आरोपी ऐकत नसताना अचानक घराच्या आतून गोळीबाराचा आवाज आला. आरोपीने आपल्या 10 वर्षांच्या मुलाला गोळी मारली होती. गोळीबाराचा आवाज ऐकताच पोलिसांच्या पथकाने कोणताही धोका न पत्करता स्टन ग्रेनेड आणि अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर करून घरात प्रवेश केला.पोलिसांना घरात प्रवेश करताना पाहताच आरोपी अरविंद सिंहने आपल्या परवानाधारक रिव्हॉल्वरमधून पोलिसांवर अंदाधुंद गोळीबार सुरू केला. त्याने तब्बल 6 राऊंड गोळ्या झाडल्या. यानंतर पोलिसांनीही प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला. यात आरोपी अरविंद सिंह गंभीर जखमी झाला. त्याला रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.आरोपी अरविंद सिंहने सर्वप्रथम आपल्या पत्नीची, त्यानंतर घरी आलेल्या दोन पुजाऱ्यांची आणि शेवटी आपल्या निष्पाप मुलाची हत्या केली. त्यानंतर त्याने मुलांना ओलीस ठेवले. आरोपीने आपल्या सर्वात लहान मुलाला हातात धरून ठेवले होते. मात्र, हातातून मूल सुटल्यानंतर ते जखमी झाले. त्यानंतर आरोपीने आपल्या मुलीला बंदुकीच्या धाकावर ओलीस ठेवले. एडीजी नवीन अरोरा यांनी सांगितले की, पोलिसांची सूझबूझ आणि उत्तम प्रशिक्षणामुळे या थरारक ऑपरेशनमध्ये तिन्ही निष्पाप मुलांचे प्राण वाचवण्यात यश आले. जखमी मुलाला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर दीर्घकाळ ओलीस राहिल्यामुळे इतर दोन्ही मुलांना डिहायड्रेशन, भूक-तहान आणि तीव्र मानसिक धक्क्याचा सामना करावा लागला.

सोन्याच्या दरात किंचित घसरण

चिखली : भारतात 23 सप्टेंबर रोजी 24 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 15,332 रुपये, 22 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 14,054 रुपये आणि 18 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 11,499 रुपये आहे.1,40,540 रुपये, 24 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 1,53,320 रुपये आणि 18 कॅरेट सोन्याच्या प्रति 10 ग्रॅमचा दर 1,14,990 रुपये आहे. भारतात 23 सप्टेंबर रोजी चांदीचा भाव प्रति ग्रॅम 249.90 रुपये आणि प्रति किलोग्रॅम 2,49,900 रुपये आहे.भारतात 22 सप्टेंबर रोजी 24 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 15,457 रुपये, 22 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 14,169 रुपये आणि 18 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 11,593 रुपये होता.

मोठे मोठे गार केले गंमतमध्ये!



जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली | प्रतिनिधी: भारत आणि जपान यांच्यातील ऐतिहासिक टी-20 सामना अखेर पार पडला. सामन्याची घोषणा झाल्यापासूनच क्रिकेट चाहत्यांमध्ये या लढतीची उत्सुकता होती. मात्र, पावसामुळे सामन्याला मोठा फटका बसला. सामना प्रत्येकी पाच षटकांचा करण्यात आला, पण जपानच्या संघाने भारतीय संघाला अक्षरशः शेवटच्या चेंडूपर्यंत झुंज दिली. अखेर टीम इंडियाने अवघ्या दोन धावांनी विजय मिळवला. सामना गमावल्यानंतरही जपानच्या कर्णधाराने आपल्या संघाच्या कामगिरीबद्दल अभिमान व्यक्त केला. केंडेल काडोवाकी-फ्लेमिंगने भारतीय संघाला शेवटच्या चेंडूपर्यंत झुंज दिल्याचा उल्लेख करत आपल्या संपूर्ण क्रिकेट समूहाचं कौतुक केलं.दोन धावांनी सामना गमावला असला, तरी जपानच्या संघाने भारतासारख्या बलाढ्य संघाला दिलेली झुंज या सामन्याचं सर्वात मोठं गोष्ट ठरली. यावर सामना संपल्यावर तो म्हणाला की, "जगातील सर्वोत्तम संघाला आम्ही शेवटच्या चेंडूपर्यंत झुंज देऊ शकलो, हीच आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. संपूर्ण क्रिकेट संघाचा मला अभिमान आहे.भारताने प्रथम फलंदाजी करताना पाच षटकांत चार गडी गमावून 32 धावा केल्या. भारतीय फलंदाजांना जपानच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच अडचणीत आणलं. पहिल्याच षटकात अभिषेक शर्मा शून्यावर बाद झाला. चार्ली हारा हिंझेच्या गोलंदाजीवर शोमा सुगायाने त्याचा झेल घेतला. यानंतर दुसऱ्या षटकात संजू सॅमसनही माघारी परतला. इब्राहिम ताकाहाशीच्या गोलंदाजीवर बेंजामिनने त्याचा झेल घेतला. सॅमसनने सात चेंडूंमध्ये एका चौकाराच्या मदतीने नऊ धावा केल्या. तिसऱ्या षटकात बेंजामिन इटो-डेव्हिसने इशान किशनला बाद केलं. इशानला केवळ तीन धावा करता आल्या. भारताची अवस्था बिकट असतानाही श्रेयस अय्यरने डाव सावरण्याचा प्रयत्न केला. अय्यरने 12 चेंडूंमध्ये 16 धावा केल्या. तिलक वर्मा तीन चेंडूंमध्ये एका धावेवर नाबाद राहिला. जपानकडून चार्लीने दोन, तर इब्राहिम ताकाहाशी आणि बेंजामिन इटो-डेव्हिस यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.भारताने दिलेल्या 33 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना जपानच्या फलंदाजांनीही चांगली सुरुवात केली. मात्र, भारतीय गोलंदाजांनी नियमित अंतराने विकेट घेत सामना रंगतदार बनवला. चार षटकांनंतर जपानच्या संघाच्या धावफलकावर तीन बाद 25 धावा होत्या. विजयासाठी त्यांना शेवटच्या 6 चेंडूंमध्ये 8 धावांची गरज होती. त्यामुळे सामन्याचा निकाल शेवटच्या षटकावर येऊन ठेपला. अक्षर पटेलच्या हातात शेवटचं षटक सोपवण्यात आलं. त्याने पहिल्या चेंडूवर एकही धाव दिली नाही. दुसऱ्या चेंडूवर जपानला एक धाव मिळाली. त्यानंतर अक्षरकडून वाईड चेंडू टाकला गेला. पुढच्या चेंडूवरही धाव झाली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

महायुतीसमोर जागावाटपाचे आव्हान; 'पुणे पदवीधर'साठी भाजप-राष्ट्रवादीत इच्छुकांची फिल्डिंग

भाजपचा पदवीधर आणि शिक्षक दोन्ही मतदारसंघांवर दावा; शिवसेनेकडून मंगेश चिवटे मैदानात

जन सम्राट टाईम्स

पुणे :। प्रतिनिधी: महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान, तर २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. निवडणुकीची तारीख निश्चित झाल्याने महायुतीतील घटक पक्षांकडून उमेदवारीसाठी सुरू असलेली मोर्चेबांधणी अधिक तीव्र झाली आहे. विशेषतः पुणे पदवीधर मतदारसंघावर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून दावे पुढे येत असल्याने जागावाटपाचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. पदवीधर मतदारसंघासाठी भाजपकडून शरद लाड यांच्या नावाची चर्चा आहे. माजी आमदार अरुण लाड यांचे पुत्र शरद लाड यांनी मतदारसंघात संपर्क वाढविल्याचे वृत्त आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रताप ऊर्फ भैय्यासाहेब माने यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादीचे नेते हसन मुश्रीफ यांनी माने यांच्या उमेदवारीबाबत भूमिका मांडल्याचे वृत्त आहे. त्यामुळे पदवीधर जागा महायुतीतील कोणत्या घटक पक्षाच्या वाट्याला जाते, याकडे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपकडून पुणे विभागातील पदवीधर आणि शिक्षक अशा दोन्ही मतदारसंघांवर दावा करण्यात आल्याचे यापूर्वी समोर आले होते. भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी दोन्ही मतदारसंघांबाबत पक्षाचा दावा व्यक्त केला होता. त्यामुळे महायुतीतील जागावाटपाचा प्रश्न अधिक चर्चेत आला आहे. शिक्षक मतदारसंघातही इच्छुकांची



संख्या वाढत आहे. शिवसेनेकडून मंगेश चिवटे यांनी पुणे शिक्षक मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची अधिकृत घोषणा केली आहे. चिवटे हे एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांचे ओएसडी म्हणून कार्यरत होते आणि सध्या शिवसेनेच्या वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख आहेत. दरम्यान, कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीने (TDF) पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे गावडे यांचे नावही महायुतीतील संभाव्य उमेदवारीच्या चर्चेत महत्त्वाचे ठरले आहे. शिक्षक मतदारसंघासाठी प्रा. डॉ. सचिन सानप यांच्या नावाचीही यापूर्वी चर्चा होती. त्यांनी TDFकडे उमेदवारीसाठी मुलाखत दिली होती; मात्र TDFने कौस्तुभ गावडे यांना उमेदवार घोषित केले आहे. त्यामुळे सानप यांच्या पुढील भूमिकेकडेही लक्ष लागले आहे. दरम्यान, महायुतीतील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या घटक पक्षांकडून इच्छुकांची नावे पुढे येत असली, तरी अंतिम जागावाटप आणि अधिकृत पक्षीय उमेदवारीचा निर्णय संबंधित पक्षांच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून होणे बाकी आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या दाव्यांनंतर महायुतीमध्ये नेमकी कोणती जागा कोणत्या पक्षाच्या वाट्याला जाते, हे पुढील चर्चांनंतर स्पष्ट होणार आहे. महाविकास आघाडीसह इतर संघटनांकडूनही मतदारसंघात तयारी सुरू आहे. त्यामुळे अधिकृत उमेदवार निश्चित झाल्यानंतर पुणे विभागातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीचे राजकीय चित्र आणखी स्पष्ट होण्याची शक्यता आहे.महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान, तर २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. निवडणुकीची तारीख निश्चित झाल्याने महायुतीतील घटक पक्षांकडून उमेदवारीसाठी सुरू असलेली मोर्चेबांधणी अधिक तीव्र झाली आहे. विशेषतः पुणे पदवीधर मतदारसंघावर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून दावे पुढे येत असल्याने जागावाटपाचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. पदवीधर मतदारसंघासाठी भाजपकडून शरद लाड यांच्या नावाची चर्चा आहे. माजी आमदार अरुण लाड यांचे पुत्र शरद लाड यांनी मतदारसंघात संपर्क वाढविल्याचे वृत्त आहे.

नशिराबाद पोलिसांची गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जनजागृती!

नागरिकांशी संवाद; सायबर फसवणूक, दागिने चोरी, वाहतूक नियमांसह डायल ११२ बाबत मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, सुव्यवस्था आणि नागरिकांची सुरक्षितता अबाधित राहावी, यासाठी नशिराबाद पोलीस ठाण्याच्या वतीने विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली. नशिराबाद पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व पोलीस पथकाने शहरातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रत्यक्ष भेटी देत मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांशी संवाद साधला. गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलिसांकडून मंडळांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. तसेच गणेश मंडपांमध्ये विविध विषयांवरील माहितीपर पोस्टर्स लावून नागरिकांमध्ये सुरक्षेविषयी जनजागृती करण्यात आली. सायबर फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले. अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये, ओटीपी, एटीएम, बँक खाते किंवा अन्य वैयक्तिक आर्थिक माहिती कोणाशीही शेअर करू नये, असे मार्गदर्शन करण्यात आले. आपत्कालीन मदतीसाठी डायल ११२ कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी तातडीने पोलिसांची मदत घेण्यासाठी डायल ११२ या २४ तास उपलब्ध असलेल्या हेल्पलाइनचा वापर करावा, अशी माहिती देण्यात आली. उत्सवादरम्यान काही अनुचित प्रकार किंवा संशयास्पद घटना निदर्शनास आल्यास त्वरित पोलिसांना कळविण्याचे आवाहनही करण्यात आले. गर्दीच्या ठिकाणी दागिने चोरीबाबत सतर्कता गणेशोत्सवात दर्शनासाठी मोठी गर्दी होत असल्याने गर्दीचा गैरफायदा घेऊन सोनसाखळी किंवा दागिने चोरीच्या



घटना घडण्याची शक्यता लक्षात घेता महिलांनी विशेष सतर्क राहावे, अशा सूचना देण्यात आल्या. गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनीही मंडप व परिसरातील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवावे, असे पोलिसांनी सांगितले. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करा उत्सवाच्या काळात शहरातील वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी रस्त्यावर वाहने अस्ताव्यस्त पद्धतीने उभी करू नयेत. वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची मंडळांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवणे तसेच गणेशोत्सव काळात पोलिसांना आवश्यक ते सहकार्य करणे, याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. नशिराबाद पोलिसांच्या या जनजागृती मोहिमेमुळे गणेशोत्सव काळातील सुरक्षा आणि नागरिकांच्या जबाबदारीबाबत मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली. गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन नशिराबाद पोलिसांनी केले आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, सुव्यवस्था आणि नागरिकांची सुरक्षितता अबाधित राहावी, यासाठी नशिराबाद पोलीस ठाण्याच्या वतीने विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली. नशिराबाद पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व पोलीस पथकाने शहरातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रत्यक्ष भेटी देत मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांशी संवाद साधला. गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलिसांकडून मंडळांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. तसेच गणेश मंडपांमध्ये विविध विषयांवरील माहितीपर पोस्टर्स लावून नागरिकांमध्ये सुरक्षेविषयी जनजागृती करण्यात आली. सायबर फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले. अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये, ओटीपी, एटीएम, बँक खाते किंवा अन्य वैयक्तिक आर्थिक माहिती कोणाशीही शेअर करू नये, असे मार्गदर्शन करण्यात आले. आपत्कालीन मदतीसाठी डायल ११२ कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी तातडीने पोलिसांची मदत घेण्यासाठी डायल ११२ या २४ तास उपलब्ध असलेल्या हेल्पलाइनचा वापर करावा, अशी माहिती देण्यात आली. उत्सवादरम्यान काही अनुचित प्रकार किंवा संशयास्पद घटना निदर्शनास आल्यास त्वरित पोलिसांना कळविण्याचे आवाहनही करण्यात आले. गर्दीच्या ठिकाणी दागिने चोरीबाबत सतर्कता गणेशोत्सवात दर्शनासाठी मोठी गर्दी होत असल्याने गर्दीचा गैरफायदा घेऊन सोनसाखळी किंवा दागिने चोरीच्या घटना घडण्याची शक्यता लक्षात घेता महिलांनी विशेष सतर्क राहावे, अशा सूचना देण्यात आल्या. गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनीही मंडप व परिसरातील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवावे, असे पोलिसांनी सांगितले. वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची मंडळांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवणे तसेच गणेशोत्सव काळात पोलिसांना आवश्यक ते सहकार्य करणे, याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. नशिराबाद पोलिसांच्या या जनजागृती मोहिमेमुळे गणेशोत्सव काळातील सुरक्षा आणि नागरिकांच्या जबाबदारीबाबत मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली. गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन नशिराबाद पोलिसांनी केले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

योगिता पाटील यांच्यावर बनावट रेल्वे तिकिटांप्रकरणी गुन्हा!

जन सम्राट टाईम्स



पारोळा | प्रतिनिधी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ दरम्यान निवडणूक साहित्य आणण्यासाठी केलेल्या प्रवासाच्या खर्चाच्या देयकांसोबत कथित बनावट रेल्वे तिकिटे सादर करून शासकीय निधीचा गैरवापर करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी नशिराबाद येथील मंडळ अधिकारी तथा तत्कालीन सहाय्यक महसूल अधिकारी श्रीमती योगिता पाटील यांच्याविरुद्ध जळगाव येथील जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी केलेल्या प्रवासाचा खर्च मिळण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकांसोबत जोडलेल्या रेल्वे तिकिटांबाबत जुलै आणि सप्टेंबर २०२६ मध्ये दैनिक 'दिव्य मराठी'मध्ये वृत्त प्रसिद्ध झाले होते. या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते तथा RTI Trainer & Social Activist दिपककुमार पी. गुप्ता यांनी तक्रार अर्जाद्वारे केली होती.

अभिलेख व प्रवास देयकांची तपासणी तक्रार अर्ज आणि वृत्तपत्रातील वृत्तांच्या अनुषंगाने जिल्हा निवडणूक शाखा व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संबंधित अभिलेख, प्रवास देयके आणि त्यासोबत जोडण्यात आलेल्या रेल्वे तिकिटांची तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान योगिता पाटील यांनी सादर केलेल्या काही रेल्वे तिकिटांवरील PNR Number आणि Transaction ID समान असल्याचे निदर्शनास आल्याचे संबंधित चौकशीच्या नोंदींमध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित तिकिटे प्रथमदर्शनी बनावट असल्याचा संशय निर्माण झाल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर फौजदारी कारवाई प्रकरणाची चौकशी आणि उपलब्ध अभिलेखांच्या आधारे फौजदारी कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजुरी देण्यात आली. त्यानुसार उपजिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना मोरे यांनी २१ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हापेठ पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांना पत्र देऊन फौजदारी कारवाईचे आदेश दिले. या कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार राहुल सोनवणे यांना अधिकृत करण्यात आले होते. त्यानुसार राहुल सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून २१ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल वाघ, जिल्हापेठ पोलीस ठाणे, जळगाव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. दरम्यान, माहिती अधिकार कार्यकर्ते दिपककुमार गुप्ता यांनी यापूर्वी दिलेल्या तक्रारीवरून आता रीतसर गुन्हा दाखल झाल्याची माहिती जिल्हापेठ पोलिसांनी त्यांना पत्राद्वारे कळविली आहे. महसूल वर्तुळात खळबळ निवडणूक कामाशी संबंधित प्रवास देयकांमध्ये कथित बनावट रेल्वे तिकिटांचा वापर केल्याच्या आरोपावरून महसूल विभागातील अधिकाऱ्याविरुद्ध थेट फौजदारी गुन्हा दाखल झाल्याने जळगाव जिल्ह्यातील महसूल वर्तुळात खळबळ उडाली आहे.

गणपती दर्शनानिमित्त आ. मंगेश चव्हाण यांची मुकेश पाटील यांनी घेतली भेट

जन सम्राट टाईम्स



धरणगाव | प्रतिनिधी: गणेशोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त चाळीसगाव नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली असताना, बाभळे गावाचे सुपुत्र तथा युवा समाजसेवक श्री. मुकेश पाटील यांनी चाळीसगाव येथे गणपती दर्शन घेत आमदार मंगेशदादा चव्हाण यांची सदिच्छा भेट घेतली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीमुळे परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. चाळीसगाव येथील प्रसिद्ध गणेश मंडळाच्या भव्य देखाव्यासमोर ही सदिच्छा भेट झाली. यंदा मंडळाने अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या धर्तीवर भव्य देखावा उभारला आहे. आकर्षक विद्युत रोषणाईने सजलेला हा देखावा भाविकांचे विशेष आकर्षण ठरत असून, दर्शनासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. याच भक्तिमय वातावरणात मुकेश पाटील आणि आमदार मंगेशदादा चव्हाण यांच्यात आपुलकीने संवाद झाला. यावेळी गणेशोत्सवाचे आयोजन, सामाजिक उपक्रम तसेच परिसरातील विविध विषयांवर चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. बाभळे गावाशी कायम जपली नाळ मूळचे बाभळे गावचे असलेले मुकेश पाटील हे सध्या समाजसेवेत सक्रिय असून, आपल्या गावाशी असलेली नाळ त्यांनी कायम जपली आहे. गावाच्या विकासासाठी विविध विषयांवर ते सातत्याने पाठपुरावा करीत असल्याचे सांगण्यात येते. आमदार मंगेशदादा चव्हाण आणि मुकेश पाटील यांच्यातील स्नेहपूर्ण संबंधही परिसरात परिचित आहेत. भेटीदरम्यान बाभळे गाव व परिसरातील विकासकामे, आगामी सामाजिक उपक्रम तसेच गणेशोत्सवाच्या नियोजनाबाबत चर्चा झाल्याचे समजते. आमदार मंगेशदादा चव्हाण यांनी मुकेश पाटील यांचे गणपती दर्शनासाठी स्वागत करून त्यांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणपती बाप्पाच्या दर्शनासोबतच झालेल्या या सदिच्छा भेटीमुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात भेटीचा समारोप करण्यात आला.

जळगाव जिल्ह्यासह पारोळा तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा!

मागण्या मान्य न झाल्यास १५ दिवसांत बेमुदत उपोषणाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी: खरीप हंगामात पावसाने लांबविलेली दडी, पिकांवर आलेली रोगराई आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे जळगाव जिल्ह्यासह पारोळा तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे जळगाव जिल्ह्यासह पारोळा तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने दुष्काळी मदत द्यावी, अशी मागणी स्व. शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत तहसीलदार उल्हास देवरे यांना निवेदन देण्यात आले. यंदाच्या खरीप हंगामाची सुरुवातच तुरळक पावसाने झाली.

पावसाने तब्बल २५ ते ३० दिवस उशिराने हजेरी लावल्याने पेरण्यांवर परिणाम झाला. त्यानंतर काही काळ पाऊस झाला असला तरी गेल्या महिनाभरापासून पावसाने पुन्हा दडी मारल्याने पिकांची अवस्था बिकट झाली आहे. हवामान अभ्यासक व तज्ज्ञांनी यंदा दुष्काळसदृश



परिस्थिती निर्माण होण्याचा अंदाज व्यक्त केला होता. प्रत्यक्ष परिस्थिती पाहता अनेक भागांत त्याची झळ जाणवत असल्याचे शेतकरी संघटनेने निवेदनात म्हटले आहे. पावसाच्या लहरीपणाचा पिकांना मोठा फटका शेतकऱ्यांनी कर्ज काढून तसेच पदरमोड करून बियाणे, खते, औषधे, फवारणी, निंदणी आणि मशागतीवर मोठा खर्च केला. मात्र, पावसाने ऐन पिकांच्या वाढीच्या काळात पाठ फिरवल्याने उत्पादनावर गंभीर परिणाम झाला आहे. कापूस पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादन खर्चही भरून निघण्याची शक्यता कमी झाली असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. एकीकडे उत्पन्नाची आशा मावळत असताना दुसरीकडे कर्जाचा डोंगर वाढत असल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे.

शासनाकडून या गंभीर परिस्थितीची दखल घेतली जात नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत असल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. मागील वर्षाची विमा भरपाईही रखडली शेतकरी संघटनेने मागील वर्षाच्या पीकविमा आणि नुकसानभरपाईचा मुद्दाही उपस्थित केला आहे. अनेक शेतकऱ्यांना अद्याप पीकविमा व नुकसानभरपाई मिळालेली नसल्याचा दावा संघटनेने केला. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही सरसकट कर्जमाफी मिळालेली नाही. त्यामुळे यंदाच्या नैसर्गिक संकटासोबतच जुन्या आर्थिक अडचणींचाही सामना शेतकऱ्यांना करावा लागत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. शेतकरी संघटनेच्या प्रमुख मागण्या शेतकरी संघटनेने निवेदनाद्वारे शासनाकडे विविध मागण्या केल्या आहेत.

औषध विक्रेता संघटनेच्या शहराध्यक्षपदी हर्षल चौधरी!

जन सम्राट टाईम्स

भडगाव | प्रतिनिधी: भडगाव तालुका औषध विक्रेता संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. जळगाव जिल्हा अध्यक्ष सुनीलभाऊ भंगाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत भडगाव शहर औषध विक्रेता संघटनेच्या शहराध्यक्षपदी युवा नेतृत्व हर्षल चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.औषध विक्रेत्यांच्या विविध अडचणी, संघटनेशी संबंधित प्रश्न तसेच सामूहिक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. त्यांच्या या कार्याची दखल घेत संघटनेच्या सदस्यांनी त्यांच्यावर शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली. औषध विक्रेत्यांच्या प्रश्नांना मिळणार संघटित व्यासपीठ हर्षल चौधरी यांच्या बिनविरोध निवडीचे उपस्थित पदाधिकारी व सदस्यांनी स्वागत केले. त्यांच्या नेतृत्वाखाली भडगाव शहरातील औषध विक्रेते व मेडिकल व्यावसायिकांच्या विविध समस्या संघटितपणे मांडण्यासाठी तसेच संघटनेचे विविध उपक्रम व धोरणात्मक कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.निवड झाल्याबद्दल अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. बी. बी. भोसले, जळगाव ग्रामीण जिल्हाध्यक्ष भानुदास महाजन, भडगाव तालुकाध्यक्ष निलेश महाले, जळगाव जिल्हा सल्लागार संजय पाटील, जळगाव उपाध्यक्ष दीपक अमृतकर, जळगाव संपर्कप्रमुख भरत चव्हाण, तालुका सचिव यश कुमार पाटील, तालुका संघटक समाधान पाटील, सहसंघटक शशिकांत तायडे, तालुका संपर्कप्रमुख अशितोष कुमार पाटील यांच्यासह अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी हर्षल चौधरी यांचे अभिनंदन करत त्यांच्या नेतृत्वाखाली भडगाव शहरातील औषध विक्रेता संघटना अधिक सक्षम व प्रभावीपणे कार्य करेल.

श्री गणेश युवा मित्रमंडळ व मुक्तीतर्फे मोफत आरोग्य व रक्तदान शिबिर!



जन सम्राट टाईम्स

जळगाव| प्रतिनिधी: श्री गणेश युवा मित्रमंडळ आणि मुक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवानिमित्त महाबळ स्टॉप परिसरात मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी मोफत आरोग्य तपासणी, उपचार, मार्गदर्शन आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात हृदयरोग तपासणी, रक्तदाब, रक्तातील साखरेचे प्रमाण, शरीरातील ऑक्सिजनचे प्रमाण तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन व उपचाराबाबत सूचना देण्यात आल्या. आर. एल. मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, मानराज पार्क परिसर यांच्या माध्यमातून वैद्यकीय तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच न्यू श्रद्धा डेंटल क्लिनिकच्या माध्यमातून दंत तपासणी करण्यात आली. नागरिकांना दातांची स्वच्छता, मौखिक आरोग्य आणि दातांच्या निगेबाबत आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले. २१ युवकांचे रक्तदान शिबिरातील रक्तदान उपक्रमात माधवराव गोळवलकर रक्तसंकलन केंद्राच्या माध्यमातून रक्तसंकलन करण्यात आले. यावेळी २१ युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा संकल्प केला. तर एकूण १२२ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. या आरोग्य शिबिरासाठी डॉ. दीपक पाटील, डॉ. वैशाली पुरी आणि डॉ. निखिल बाविस्कर यांच्या वैद्यकीय पथकाने सहकार्य केले. युवकांचा उत्स्फूर्त सहभाग शिबिराच्या आयोजनासाठी श्री गणेश युवा मित्रमंडळाचे रिदम सूर्यवंशी, तुषार वाणी, हर्षल वाणी, वैभव निकुंभ, कार्तिक पाटील, यश वाणी, तेजस शिरुडे, लविश जांगिड यांच्यासह परिसरातील युवकांनी परिश्रम घेतले. सामाजिक सेवाभावी संस्था मुक्ती फाउंडेशनचे मुकुंद गोसावी यांचे या उपक्रमाला मोलाचे सहकार्य लाभले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक उपक्रमांसोबत सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य तपासणी आणि रक्तदानासारखा उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करण्यात आले.

गणेश विसर्जनासाठी जाणाऱ्या रिक्षावर दगडफेक; चौघी महिला जखमी

रावेरमध्ये तणावाचे वातावरण; १४ जणांविरुद्ध दंगल व ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा

जन सम्राट टाईम्स

रावेर। प्रतिनिधी : रावेर शहरातील आंबेडकरनगर परिसरात घरगुती गणपती विसर्जनासाठी रिक्षाने जात असलेल्या नागरिकांना रस्ता अडवून विरोध केल्यानंतर दगडफेक झाल्याची घटना शनिवार, दि. २० सप्टेंबर रोजी दुपारी घडली. या घटनेत चार महिला जखमी झाल्या असून, याप्रकरणी रावेर पोलिस ठाण्यात १४ जणांविरुद्ध दंगल, रस्ता अडवणे, दगडफेक तसेच ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याने पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला. आंबेडकरनगर येथील लताबाई ईश्वर घेटे या कुटुंबीयांसह घरगुती गणपती विसर्जनासाठी रिक्षाने पुनखेडा येथील भोकर नदीपात्राकडे जात होत्या. त्यांच्या घराकडून जाणारा मार्ग रजा कॉलनीतून जातो. शनिवारी दुपारी सुमारे तीन वाजेच्या सुमारास रिक्षा या परिसरातून जात असताना काही महिला व पुरुषांनी रिक्षा अडवून या मार्गाने गणपती विसर्जनासाठी नेण्यास विरोध केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

वाद वाढल्यानंतर दगडफेक रस्ता अडवून विरोध केल्यानंतर वाद वाढला. त्यानंतर एका गटाकडून रिक्षा तसेच गणपती विसर्जनासाठी जाणाऱ्या



नागरिकांच्या दिशेने दगडफेक करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेत दिपाली घेटे, उज्ज्वला घेटे, लताबाई घेटे आणि संध्या घेटे या चार महिला जखमी झाल्या. घटनेची माहिती मिळताच रावेर पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतर लताबाई घेटे यांच्या फिर्यादीवरून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. १४ जणांविरुद्ध गुन्हा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीत शेख जमीर शेख उस्मान, इब्राहिम इरफान, इरफान उमर शेख, रईस हॉटेलवाला आणि मोईन रईस हॉटेलवाला यांच्यासह एकूण १४ जणांचा समावेश आहे. त्यांच्याविरुद्ध दंगल, रस्ता अडवणे, दगडफेक आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (ॲट्रॉसिटी) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अतिरिक्त पोलिस कुमक तैनात घटनेची गंभीरता लक्षात घेऊन जळगावहून अतिरिक्त पोलिस कुमक मागविण्यात आली. निंभोरा पोलिस ठाण्याच्या पोलिस उपनिरीक्षक मीरा देशमुख यांच्यासह अतिरिक्त पोलिस कर्मचारी परिसरात तैनात करण्यात आले आहेत. दरम्यान, जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत ढिवरे आणि अपर पोलिस अधीक्षक यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. परिसरात शांतता व सुव्यवस्था कायम राहावी यासाठी पोलिसांकडून खबरदारीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू असून, घटनेत सहभागी असलेल्या प्रत्येक व्यक्तीची भूमिका, दगडफेकीचे नेमके कारण आणि घटनेची संपूर्ण पार्श्वभूमी तपासण्यात येत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

लक्झरीतून 5385 किलो माव्याची वाहतूक रोखली; एफडीएची कारवाई

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अहमदाबाद-अकोला मार्गावरील कारवाई; १६.५२ लाखांचा मावा जप्त, चालक ताब्यात

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिठाईसाठी वापरल्या जाणाऱ्या माव्याच्या वाहतुकीवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) धडक कारवाई केली आहे. अहमदाबादहून अकोल्याच्या दिशेने लक्झरी बसमधून वाहतूक करण्यात येत असलेला तब्बल ५ हजार ३८५ किलो मावा (खवा) मोराणे हद्दीत अन्न व औषध प्रशासनाने धुळे तालुका पोलिसांच्या मदतीने पकडला. विविध कंपन्यांचा १३ प्रकारचा हा मावा असून त्याची अंदाजे किंमत १६ लाख ५२ हजार १०० रुपये आहे.

या कारवाईत माव्याचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून, प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाकडून देण्यात आली. माहिती मिळताच सापळा; लक्झरी बस अडवली गणेशोत्सवाच्या काळात मिठाई तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या माव्याची मोठ्या प्रमाणात अहमदाबादहून अकोल्याच्या दिशेने वाहतूक होत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती. त्यानंतर एफडीएच्या पथकाने धुळे तालुका पोलिसांच्या सहकार्याने संबंधित मार्गावर सापळा रचला. यावेळी अशोक लेलँड कंपनीची वेलकम लक्झरी बस (क्रमांक एमपी-४४ झेडएफ-७२१४) अडवून तिची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान बसमध्ये मोठ्या प्रमाणात मावा आढळून आला. प्रशासनाने हा माल जप्त करून त्याचे नमुने प्रयोगशाळेच्या तपासणीसाठी पाठविले आहेत. १३ प्रकारचा मावा जप्त कारवाईदरम्यान विविध कंपन्यांचा १३ प्रकारचा एकूण ५ हजार ३८५



किलो मावा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या मालाची किंमत १६ लाख ५२ हजार १०० रुपये असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात मिठाई व दुग्धजन्य पदार्थांच्या मागणीत वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. मात्र, जप्त मावा भेसळयुक्त आहे की नाही, याबाबतचा अंतिम निष्कर्ष प्रयोगशाळेच्या अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. चालक व क्लीनर ताब्यात

या प्रकरणी जगदीश मानजी पाटीदार, महेंद्रसिंग परबतसिंग राठोड (वाहनचालक) आणि राजकुमार रोशनलाल आचार्य (क्लीनर) यांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. जप्त केलेल्या माव्याच्या नमुन्यांच्या तपासणी अहवालानंतर प्रकरणातील पुढील कारवाई निश्चित होणार आहे. एफडीएच्या पथकाची संयुक्त कारवाई ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त मंगेश माने, सहाय्यक आयुक्त गोपाल माहोरे, अन्नसुरक्षा अधिकारी आनंद पवार, अरविंद राऊत, मंगेश भावसार तसेच धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक खाकीदा सय्यद, सतीश कोठावदे आणि पंकज पाटील यांच्या पथकाने केली. गणेशोत्सवाच्या काळात अन्नपदार्थांच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यासाठी प्रशासनाकडून करण्यात आलेल्या या कारवाईमुळे अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा मिळाला आहे.

